दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक २० • Title - Code :- MAHMAR4951 • शनिवार दि.०७ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# गोठवलेले खाते सुरु करा : कांदा अनुदान प्रकरण

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांची बाजार समितीवर धडक

### दोन दिवसापासून सर्वच खाते झाले सुरू



कांदा अनुदान प्रकरणा मध्ये राज्य शासनाने जानेवारी मध्ये अनुदान घोषित केले होते .आणि अनुदान हे मार्च पर्यंत आले असते परंतु शासनाकडून थोडी दिरंगाई झाल्याने हे अनुदान उशिरा आले .शासनाने प्रत्येक बाजार समितीला ज्या शेतकऱ्यांनी कांदा उत्पादन केले आहे त्यांचे अर्ज मागविले.त्याच्यात तालुका स्तरीय त्री सदस्य समिती , जिल्हा स्तरीय त्री सदस्य समिती यांच्या मार्फत त्या अर्जाची छानणी करण्यात आली.त्या मध्ये तलाठी , ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांनी तालुका लेव्हल वर सर्वे केले . शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे केले .त्या प्रमाणे हि यादी बनविण्यात आली होती . त्यानुसार डी.डी .आर यांनी ती यादी पणन खात्याकडे पाठविली आणि पणन ने डायरेक्ट शेतकऱ्यांच्या खात्यात ती रक्कम जमा केली.वास्तविक रक्कम जमा झाल्यावर त्याची तक्रार आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी पणन मंत्र्याकडे केल्यामुळे. पणन खात्याने सर्वांचे खाते गोठविण्याचे आदेश दिले होते परंतु शेतकऱ्यांच्या मागणी नुसार आम्ही जिल्हा मध्यवर्ती बँक असो किंवा इतर राष्ट्रीयकृत बँका ज्यांनी शेतकऱ्यांचे खाते गोठविले होते त्यांना खाते गोठवु नका फक्त जी अनुदानाची रक्कम आहे ती लॉक करा ती मागणी केलेली आहे . त्याप्रमाणे दोन दिवसापासून सर्वच खाते सुरु झाले आहे .कुठल्याच खात्याची अडचण नाही अनुदानाची जी रक्कम आहे ती गोठविण्यात आली आहे .

**डॉ.विजय देवतळे**
**सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती वरोरा**





**वरोरा :** कांदा अनुदान प्रकरणामध्ये पणन संचालक व जिल्हा उपनिबंध चंद्रपूर यांनी चौकशी सुरू केली आहे.चौकशी बरेच दिवस सुरू राहणार असल्याने शेतकऱ्यांचे गोठवण्यात आलेले बँक खाते सुरू करण्यात यावे या मागणीला घेऊन शेकडो कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आज (६ ऑक्टोबर ) रोज शुक्रवारला कृषी उत्पन्न बाजार समितीवर धडक देत मागणीचे निवेदन दिले .



राज्य शासनाने जानेवारी मध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्याची घोषणा केली. कांदा उत्पादन शेतकऱ्यांच्या खात्यात पणन खात्याने आरटीजीएस द्वारे पैसे जमा केले.सदर अनुदानातील प्रकार हा खोटा असल्याचा आरोप करुन त्याबाबत चौकशी करावी असे आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी पणन संचालक व पणन मंत्री यांच्याकडे तक्रार केली होती. त्या तक्रारीच्या आधारे चौकशी सुरु झाली असून अनुदान उचलणाऱ्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे खाते गोठविण्यात आले आहे. सध्या शेतीच्या कामांना वेग आला असून सोयाबीन पीक कापणीवर आले आहे तर कपास व इतर पिकांना फवारणी तसेच खात देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना शेतमजूरांना पैसे देण्याचे असल्याने मजुरांनी त्यांच्या मागे तगादा लावला आहे . अशा परिस्थितीत खाते गोठविल्याने त्यांचे सर्व आर्थिक व्यवहार ठप्प झाले असून कुठलेही व्यवहार करू शकत नसल्याने शेतकरी पुरता हैराण झाला आहे . गोठविलेले खाते सुरु करण्याच्या मागणी साठी संतप्त शेतकऱ्यांनी ०६ ऑक्टोंबर रोज शुक्रवारला कृषी उत्पन्न बाजार समितीवर धडक देत येथे उपस्थित असलेल्या तक्रारदार कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा विद्यमान संचालक राजेन्द्र चिकटे यांना जाब विचारला. यावेळी काही काळ गोंधळ निर्माण झाला होता .शेतकऱ्यांनी तक्रारदार यांच्या विरोधात घोषणाबाजी हि केली.यावेळी विद्यमान सभापती व उपसभापती यांनी शेतकऱ्यांची समजूत घालून देत शेतकऱ्यांचे खाते गोठविण्यात कृषी उत्पन्न बाजार समितीचा कुठलाही हस्तक्षेप नसल्याचे शेतकऱ्यांना समजावून सांगितले. त्यांनतर संतप्त झालेले शेतकरी शांत झाले.

### शेतकऱ्यांवर कुठलाही अन्याय होऊ देणार नाही



शेतकऱ्यांना अनुदान मिळालेच पाहिजे या मताचे आम्ही आहोत .परंतु शेतकऱ्यांना पाच हजार आणि ६५ हजार एजंटला असे जे एजंट ने पैसे नेले त्या विरोधात आम्ही तक्रार केलेली आहे. शेतकऱ्यांना पैसे मिळालेच पाहिजे या मताचे आम्ही आहोत परंतु शेतकऱ्यांना तीन ते पाच हजार मिळाले पण बाकी पैसे एजंट ज्यांनी हा घोळ केला आहे त्यांनी घेतले. त्याविरोधात आम्ही तक्रार केली आहे. शेतकऱ्यांवर कुठलाही अन्याय होऊ देणार नाही अशी आमची भूमिका आहे.

**राजेंद्र चिकटे**
**माजी सभापती तथा विद्यमान संचालक**
**कृषी उत्पन्न बाजार समिती वरोरा**

### शेतकऱ्यांच्या अनुदानाची चौकशी मग लोकप्रतिनिधींची का नाही ?

खाते गोठविलेल्या शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती वर धडक देत खाते गोठविलेले खाते सुरु करण्याची मागणी रेटून धरली होती.यावेळी संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आम्ही उचललेल्या अनुदानाची चौकशी करता मग लोकप्रतिनिधींनी कमविलेल्या कोट्यवधी रुपयांची चौकशी का नाही अशा घोषणा दिल्या.

# वसुधैव कुटुंबकमचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संदेश आपल्या माध्यमातून सर्वत्र पोहोचेल

## ना.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला ब्रिटेनच्या भारतीयांसमोर विश्वास

**लंडन । प्रतिनिधी**

जगातील कोणता देश मोठा आहे, याचे मूल्यांकन त्या देशातील सुखांक(हॅप्पीनेस इंडेक्स) बघून निश्चित करण्याचे संयुक्त राष्ट्र संघाने आता ठरविले आहे; मला अभिमान आहे की संस्कृती आणि परंपरांमुळे संस्कारित भारत देश यामध्ये नक्कीच अव्वल स्थानावर आहे; ब्रिटेन मध्ये आपण या संस्कारित देशाचे ब्रँड अँम्बेसिडर म्हणून काम करताहात, 'जियो और जिने दो' या भावनेतून वसुधैव कुटुंबकम चा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला संदेश आपल्या माध्यमातून सर्वत्र पोहोचेल असा मला विश्वास आहे, अश्या भावना महाराष्ट्राचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या. येथील बांबू हाऊस येथे ओवरसीस फ्रेंड्स ऑफ बीजेपी च्या लंडन यूनिटकडून ना. मुनगंटीवार यांच्यासोबत चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रात ते बोलत होते.

ब्रिटेन चे खासदार विरेंद्र शर्मा, ओवरसीस बीजेपी लंडनचे अध्यक्ष कुलदीप शेखावत, सरचिटणीस सुरेश मंगलगिरी, महिला संघटन 'सहेली' च्या समन्वयक कृष्णा पुजारा यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. ना. सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले की, आम्ही भाग्यवान आहोत कारण आम्हाला असे पंतप्रधान लाभले आहेत जे संसदेला लोकशाहीचे पवित्र मंदिर मानतात, संविधानाला सर्वश्रेष्ठ ग्रंथ मानतात आणि देशातील प्रत्येक गरीब माणसांत देवाचा अंश बघतात. राष्ट्र सर्वोपरि या भावनेने काम करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्वाच्या नकाशावर भारताला नंबर वन करण्यासाठी यशस्वी वाटचाल सुरू केली आहे. धन, संपत्ती कमावताना ती इतरांच्या सुख-दुःखात उपयोगी पडावी यासाठी जगणे ही आपली संस्कृती आणि विचार आहे; भारतीय तत्वज्ञान,



संस्कृती जगाने स्वीकारायला सुरुवात केली आहे, आपण त्याला बळ देण्यासाठी भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दी महोत्सवापर्यंत जगातील प्रत्येक देशाने भारताला सॅल्यूट करावा अशी स्थिती आपल्याला निर्माण करायची आहे; यासाठी आपणही खारीचा वाटा उचलायला हवा असे प्रतिपादन ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. ब्रिटन मध्ये वास्तव्यास असलेले नागरिक भारताच्या संस्कृती आणि परंपरेचे प्रतिनिधी आहेत; भारताची विचारधारा तुमच्यामुळे सर्वत्र पोहोचेल व यामुळे भारताचा सन्मान वाढणार आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखे शिवभक्तांच्या दर्शनासाठी भारतात उपलब्ध व्हावेत या भावनेने मी लंडन ला आलोय असेही ते म्हणाले.सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करताना मला अनेक महत्वाचे निर्णय घेण्याचा आणि समाजाच्या हितासाठी काम करण्याची संधी प्राप्त झाली. देशातील पहिले आयएसओ मंत्री कार्यालय करण्याचं भाग्य मला लाभलं, अयोध्येतील प्रभु श्रीराम मंदिरासाठी आणि नव्या संसदेच्या प्रवेश द्वारासाठी काष्ठ पाठविण्याची संधी मला मिळाली, एवढेच नव्हे तर ज्या अफजलखानाने हिंदवी स्वराज्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला आणि वाघनखांनी छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्याचा कोथळा बाहेर काढला त्या अफजलखानाच्या कबरीजवळ असलेले अतिक्रमण काढण्याची संधी मला मिळाली असा उल्लेख करुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कर्तुत्ववाला व विचारांना सातासमुद्रापार पोहोचविण्याचा आमचा संकल्प आहे असे ते म्हणाले; भारत देश विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात यशस्वी वाटचाल करीत असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.ब्रिटेन चे खासदार विरेंद्र शर्मा यांनी त्यांच्या मनोगतात भारताच्या सामाजिक आणि राजकीय कार्यपद्धतीबद्दल गौरवोद्गार काढून वाघनख भारतात येण्यासंदर्भात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कुलदीप शेखावत यांनी प्रास्ताविक करत ना. मुनगंटीवार यांचे स्वागत केले. ओवरसीस फ्रेंड्स ऑफ बीजेपीकडून शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला लंडन येथील मराठी, गुजराती व इतर भारतीय बांधव उपस्थित होते.

# क्रीडा क्षेत्रात आनंद निकेतन महाविद्यालय गोंडवाना विद्यापीठाच्या २१२ महाविद्यालयामधून प्रथम क्रमांकावर




**वरोरा । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली सलग्नित संपूर्ण महाविद्यालयांमधून आनंद निकेतन महाविद्यालयाला सत्र २०२२-२३ मधील विविध खेळांच्या अंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल क्रीडा सत्र २०२२ - २३ चा क्रीडा चषक महाविद्यालयाला देण्यात आला. आज पर्यंतच्या महाविद्यालयाच्या क्रीडा इतिहासामध्ये प्रथमच आननिकेतन महाविद्यालयाला विद्यापीठाचे क्रीडा चषक प्राप्त झाले. गोंडवाना विद्यापीठाचा स्थापना दिवस व महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी दिनांक २ ऑक्टोबर २०२३ ला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रशांत बोकारे, गडचिरोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मीना, प्र -कुलगुरू डॉ श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ अनिल हिरेखंन व गडचिरोली क्षेत्राचे आमदार देवराव होळी तसेच विद्यापीठांच्या आधीसभा सदस्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे आणि क्रीडा विभाग प्रमुख प्रा. तानाजी बायस्कर यांनी हा पुरस्कार स्वीकृत केला. तसेच याच पुरस्कार वितरण सोहळ्यात महाविद्यालयाचा एम एस सी प्रथम वर्षाचा विद्यार्थी अभिजित अष्टकार याला विद्यापीठाचा उत्कृष्ट विद्यार्थी हा पुरस्कार वितरीत करण्यात आला. क्रीडा स्पर्धामध्ये उत्कृष्ट महाविद्यालय या पुरस्काराचे मानकरी महाविद्यालयाचे खेळाडू आणि त्यांच्यावर मेहनत घेणारे क्रीडा शिक्षक प्रा. तानाजी बायस्कर आहे, त्यांच्यामुळेच हा पुरस्कार महाविद्यालयाला मिळाला.असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांनी केले. महाविद्यालयाने सत्र २०२२-२३ मध्ये मल्लखांब (पुरुष/महिला)- प्रथम क्रमांक,योगा (पुरुष) - प्रथम क्रमांक,मैदानी स्पर्धा (पुरुष/महिला)- प्रथम क्रमांक,सपॅक टँकरा (पुरुष/महिला)- प्रथम क्रमांक,खोखो (पुरुष)- प्रथम क्रमांक,सर्कल स्टाईल कब्बडी (पुरुष)- प्रथम क्रमांक,कार्फबॉल मिक्स (पुरुष/महिला)- प्रथम क्रमांक,हँडबॉल (पुरुष)- प्रथम क्रमांक क्रिकेट (पुरुष)- प्रथम क्रमांक,तलवारबाजी (महिला)- प्रथम क्रमांक,खोखो (महिला)- द्वितीय क्रमांक,सॉफ्टबॉल (पुरुष/महिला)- द्वितीय क्रमांक,नेटबॉल (महिला)- द्वितीय क्रमांक,फुटबॉल (पुरुष)- द्वितीय क्रमांक,तलवारबाजी (पुरुष)- द्वितीय क्रमांक,कब्बडी (पुरुष)- द्वितीय क्रमांक,क्रॉसकंट्री,(महिला)- द्वितीय क्रमांक,योगा (महिला)- तृतीय क्रमांक बास्केटबॉल (महिला)- तृतीय क्रमांक,नेटबॉल (पुरुष)- तृतीय क्रमांक,सर्कल स्टाईल कब्बडी (महिला)- तृतीय क्रमांक,रस्सीखेच (पुरुष/महिला) - तृतीय क्रमांक,बॉल बॅडमिंटन (महिला)- तृतीय क्रमांक,हँडबॉल - (महिला)- तृतीय क्रमांक,क्रॉसकंट्री (पुरुष)- तृतीय क्रमांक अश्या एकूण ३० क्रीडा प्रकारांमध्ये महाविद्यालयाने आपला विजय संपादित करून एकत्रित चॅम्पियनशिप महाविद्यालयाच्या नावावर केली. विद्यापीठाचा उत्कृष्ट क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल महारोगी सेवा समितीचे सचिव डॉक्टर विकास आमटे, पल्लवी आमटे , कौस्तुभ आमटे तसेच संपूर्ण विश्वस्त मंडळ व महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

## शब्द वेध

### तुझा अन् माझा !

हा गट माझा आहे
तो गट तुझा आहे !
तुझा-माझा करण्यामागे
कोणते रहस्य 'दडले' आहे ?
दशा आणि दिशा अशी
जहाजासारखी भरकटत आहे...
तुझ्या-माझ्या ,गटबाजीत मात्र,
जनता व्यर्थ फरफटत आहे !



**सुभाष उसेवार**
**९०११२६२४३९**

# राज्याच्या 'जीएसटी' विभागाचा देशभर डंका

**मुंबई**-देशभर प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या 'टीआयओएल' पुरस्काराने महाराष्ट्राच्या वस्तू व सेवा कर विभागाला गौरविण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या 'जीएसटी' विभागाला 'मूल्यवर्धीत कर प्रशासन' श्रेणीत सुवर्ण तर 'सुधारणावादी राज्य' श्रेणीत रौप्य पुरस्काराने आज ( दि. ५ आक्टोंबर) दिल्लीत झालेल्या शानदार कार्यक्रमात गौरविण्यात आले. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या 'जीएसटी' विभागाने ही दमदार कामगिरी केली आहे.'टॅक्स इंडीया ऑनलाईन डॉटकॉम' तथा 'टीआयओएल' हा राष्ट्रीय कर पुरस्कार देशभरात अत्यंत मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जातो. 'टॅक्स इंडीया ऑनलाईन डॉटकॉम'च्यावतीने दरवर्षी अर्थ क्षेत्रात विविध विभागात विशेष कामगिरी करणाऱ्या राज्यांना आणि त्यांच्या अर्थ विभागांना विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या वर्षी देशातील चोवीस राज्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. महाराष्ट्राच्या 'वस्तू व सेवा कर' विभागाच्याद्वारे राबविण्यात आलेले व्यापार सुविधा कार्यक्रम, करदात्यांना परताव्याची सुलभता, अभय योजना, करदात्यांच्या समस्यांचे समाधान, राज्याद्वारे 'जीएसटी' कौन्सिलमध्ये केलेले प्रभावी प्रतिनिधीत्व, विवाद कमी करण्यासाठी केलेले प्रयत्न या सर्व गोष्टींच्या मूल्यमापनाच्या आधारे राज्याला २०२३ या वर्षासाठी 'मूल्यवर्धीत कर प्रशासन' श्रेणीत सुवर्ण तर 'सुधारणावादी राज्य' श्रेणीत रौप्य पुरस्काराने गौरविण्यात आले. उपमुख्यमंत्री तथा राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या 'जीएसटी' विभागाने ही दमदार कामगिरी केली आहे.आज दिल्लीतील हॉटेल ताज येथे झालेल्या शानदार सोहळ्यात या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावर्षी देशभरातून पुरस्कारांसाठी प्राप्त झालेल्या पाचशे नामांकनांचे मूल्यमापन करण्यात आले. त्यातून विजेत्यांची निवड करण्यात आली. या वर्षीच्या निवड समितीमध्ये सुप्रीम कोर्टाचे माजी न्यायाधीश के. पटनायक, न्यायमूर्ती शिव कीर्ती सिंग, माजी वित्त सचिव आणि पंधराव्या वित्त आयोगाचे सदस्य ए.एन. झा, यांच्यासह देशभरातील प्रसिध्द व्यावसायिक आणि कायदेतज्ज्ञांचा समावेश होता. या कामगिरीबद्दल देशभरातून महाराष्ट्राचे अभिनंदन होत आहे.



**वन्यजीव सप्ताह'निमित्त वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालयात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातर्फे चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एक हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ही स्पर्धा सकाळी नऊ वाजेपासून सुरू होती. या स्पर्धेला कौशल्य विकास उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्हा पालकमंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी चित्र रंगविणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच काही चित्रांमध्येही रंग भरले.**

**हेल्मेट सक्तीची चर्चा सुरू झाल्यानंतर सोशल मीडियावर या विषयाच्या बाजूने आणि विरुद्ध चर्चा ऐकायला मिळत आहे.या चर्चांमुळे सर्व वातावरण ढवळून निघाले आहे. काही सक्तीच्या बाजूने तर काही विरूद्ध बाजूने बोलताना दिसतात. हेल्मेट सक्ती चांगली की वाईट हा विषय नाही.मात्र त्याबाबत जनसामान्यांच्या मनात काय विचार सुरू आहेत हे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.**

# हेल्मेट सक्ती!




रस्त्यावरून दुचाकी चालविताना होणारे संभाव्य अपघात टाळण्यासाठी प्रशासनाकडून दुचाकी चालकांना हेल्मेटची सक्ती करण्यात येत आहे. वाहतूक विभागातील पोलीस रस्त्यावर उभे राहून दुचाकीस्वारांच्या डोक्यावर हेल्मेट नसल्यास गाडीचे चालान फाडत असल्याचे निदर्शनास येत असल्याचे आपल्यापैकी अनेकांना निदर्शनास आले असेल. यामागे रस्त्यावरील मृत्यूचा आकडा कमी करणे हा पोलीस प्रशासनाचा उद्देश असल्याचे सांगितले जाते.एका माहितीनुसार जानेवारी ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत ५०० च्यावर अपघाताची नोंद झाल्याचे ऐकिवात आले.ज्यात फक्त दुचाकीच्या अपघाताची संख्या २७५ असल्याचे सांगतात. त्यात सव्वाशे पेक्षा जास्त जणांना मृत्यू आला अशी माहिती आहे. यावरून रस्त्यावरील वाहन चालविताना दुचाकी चालकांनी डोक्यावर हेल्मेट न घातल्यास त्याचे काय गंभीर परिणाम होऊ शकतात याची कल्पना येते. पोलीस प्रशासन दोषींवर कारवाया करत आहे. नागरिकांचे जीव वाचवण्यासाठी प्रशासनाची भूमिका स्तुत्य असली तरी केवळ हेल्मेट वापरले नसल्यामुळेच अपघात होतो हा जावईशोध लावणे चुकीचे आहे. रस्त्यावरील अपघातांसाठी अनेक अन्य गोष्टीही कारणीभूत असतात याचीही माहिती असायला हवी. जेवढे आपण हेल्मेट सक्तीसाठी प्रयत्न करत आहोत.तेवढेच अपघात होणारे इतर कारणांकडेही लक्ष द्यायला पाहिजे. मात्र प्रशासन त्याकडे हेतूपुरस्कृत दुर्लक्ष करत केवळ हेल्मेट न घालणाऱ्या दुचाकी चालकांवरच कारवाई करतात ही हास्यास्पद बाब आहे. हेल्मेटची सक्ती करत असतानाच प्रशासनाला रस्त्यावरील खड्ड्यांचा विसर पडला की काय असे वाटते. ज्या रस्त्यावरून दुचाकी धावतात त्या रस्त्यांची स्थिती कशी आहे याचाही विचार होणे जरुरी आहे. दोषयुक्त रस्तेही अपघातात महत्वाची भूमिका बजावत असतात. बरेचदा रस्त्यावर खड्डे आहे की खड्ड्यात रस्ते हेच कळत नाही. रस्ते दुरुस्तीसाठी नागरिकांना रस्त्यावर आंदोलन करावे लागते. इतकी घाणेरडी अवस्था रस्त्यांची असते. काही रस्ते तर इतके खराब आणि दयनीय आहे की, त्या रस्त्याने दोन-चार चक्करा मारल्या तरी कमरेचे दुखणे वाढते. हेल्मेट सक्तीचा आग्रह करण्यापूर्वी प्रशासनाने वाहतुकीच्या नियमांचे पालन होते का? याचेही अवलोकन करायला पाहिजे. रस्त्यावरून वाहने चालविताना अनेकजण मोबाईलवर बोलतबोलत वाहने पळवतात. आपण सार्वजनिक रस्त्यावरून वाहन चालवीत आहोत. थोडे दुर्लक्ष झाले तरी आपला स्वतःचा किंवा इतरांचे प्राण धोक्यात येऊ शकते याची साधी जाणीव या लोकांना नसते. अनेकदा वाहनचालक कान आणि खांदा यांच्यामध्ये मोबाईल धरून हेकडी मान करत रस्त्याने गाड्या चालवतात. गडबडीत अनेकदा रस्त्यावरून चालणाऱ्या सामान्य माणसांचा दोषही नसतो .मोबाईलवर बोलताना वाहनावरील नियंत्रण सुटून वा गाफील असल्यामुळे समोरच्याला ठोकून देतात. असे



मोबाईलवर बोलत जाणाऱ्यांवर पोलीस कारवाई का करत नाही. त्याचप्रमाणे शहरामध्ये सिग्नल व्यवस्थित आहे का? गावातील चौकामध्ये वाहतूक पोलीस उपस्थित असतात का? असेल तर ते प्रामाणिकपणे कारवाई करतात का?की कारवाईच्या नावाखाली सेटिंग चाललेली आहे यावरही लक्ष ठेवणे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे काम आहे. काही ठिकाणी रस्त्यांवरील ब्लाक स्पष्ट दिसत नाही. अपघात टाळण्यासाठी ब्लॅक स्पॉटवर काय उपाय केले जाते हेही सांगितले पाहिजे. दारू पिऊन वाहन चालविणे कायदेशीर गुन्हा आहे. अशा दारू पिऊन वाहन चालविणाऱ्यांवर पोलीस काय कारवाई करतात? खरोखरच ड्रंक अँड ड्राईव्हची नियमित कारवाई होते का?अशा अनेक गोष्टी अपघात होण्यासाठी कारणीभूत असतात. आमचा विरोध हेल्मेट सक्तीला नाही. परंतु हेल्मेट सक्तीचे दुसरेही जे काही परिणाम आहेत त्याचाही अभ्यास झाला पाहिजे. अनेक हेल्मेटधारकांचे म्हणणे आहे की, रस्त्यावर वाहन चालविताना गाडी खड्डयावरून गेल्यास पाठीचे आणि मणक्याचे विकार वाढतात . हेल्मेट घातल्यामुळे अनेकदा समोरचे नीट दिसत नाही. अनेकदा नीट ऐकूही येत नाही. हेल्मेटमुळे अनेकांना त्वचारोग देखील झाल्याचे सांगण्यात येते.वजन सहन न झाल्याने मानेचा त्रास होत असल्याच्या तक्रारीही आहे. गाडी चालवताना फोनवर बोलू नये असा नियम आहे. पण रस्त्यावर उभे राहून आपण अवलोकन केल्यास बोलू नये ऐवजी, बोलून ये असा लोकं अर्थ काढतात की काय असे दिसते. वाहनचालक फोनवर अनेकदा ब्लू टूथ, हँड्स फ्री साधनांचा वापर करतात.किंवा मागे बसणारा पुढच्याच्या कानाला फोन लावून बोलायला मदत करतो. हेल्मेट आणि कानाच्यामध्ये फोन लावून बोलत असल्याचे अनेकदा दिसून येते. सरकार जेवढे कायदे काढते त्यापेक्षाही लोक बेकायदा अनेक पळवाटा शोधतात. गाडीवर दोन पेक्षा जास्त लोकांनी बसू नये हा नियम असला तरी जर या नियमाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केल्यास अनेक कुटुंबांची पंचायत होईल हे सांगायला कुठल्या ज्योतिषाची गरज नाही. प्रत्येक गाडीला आरसा असलाच पाहिजे.चाकात आवश्यक हवा असली पाहिजे.गाडीचा हॉर्न वाजला पाहिजे. अनेकजण कर्णकर्कश हॉर्न वापरतात. पोलीस काय करतात. हेल्मेट घातल्यामुळे समोरच्या व्यक्तीचा चेहरा लपला गेल्यामुळे ती व्यक्ती कोण आहे हे लक्षात येत नाही. ज्याचा गैरफायदा समाजकंटक घेण्याची संभावना असते. त्यामुळे सुरक्षेचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो. अनेकदा आरोपी डोक्यावर हेल्मेट घालून पोलिसांना चकमा देत पळाल्याचा घटना ऐकीवात आहे. हेल्मेट घातल्यामुळे जीव वाचणार असेल तर त्याची सक्ती जरूर करावी परंतु यासोबतच दुसरी बाजू लक्षात घ्यावी एवढेच या निमित्ताने सुचवायचे आहे.हेल्मेट वापरायला विरोध नाही तर हेल्मेटच्या सक्तीला आहे. जेव्हा आपण हेल्मेट वापरण्याच्या अपेक्षा करतो त्यासोबत त्याचे गैरपरिणाम आणि वाहनांना रस्त्यावर मिळणाऱ्या इतर सोयी गैरसोयी या बाबींवर सुद्धा विचार व्हायला पाहिजे नाही का?

# गरीब मराठा समाजावरील सरकारचा अन्याय !

मराठा आरक्षणाची लढाई महाराष्ट्रामध्ये आता जन आंदोलनामध्ये परिवर्तित झालेली आहे हे आपणास दिसून येत आहे पहिल्यापासूनच मराठा समाजावर अन्याय करण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे सरकारी यंत्रणेने घेतलेली आहे हे अभ्यासाची आपल्याला दिसून येत आहे काही लोक पहिल्यापासून म्हणतात की हा समाज कारखानदारी करणारा समाज असून जमीनदारांचा समाज असून शिक्षण सम्राटांचा राजकीय पुढाऱ्यांचा समाज आहे ही या समाजावरचा आक्षेप काही लोक महाराष्ट्रामध्ये घेत असतात परंतु आपण जर विचार केला तर २५ टक्के समाज हा तर भूमिहीनच आहे राहिलेल्या समाजामध्ये जवळपास ९५ टक्के हे अल्पभूधारक आहेत दारिद्र्यरेषेखाली काम करणारे रोजंदारीवर काम करणारे हे लोक आहेत शिक्षणामध्ये यांचे प्रमाण नगर आहे निरक्षरतेने भरलेला हा समाज आणि नोकरी विषयक यांचं प्रमाण तर फार अल्प आहे सामाजिक दृष्ट्या हा समाज आर्थिक विभंजन येत आहे आणि म्हणून यांची कुटुंबीय अवस्था फार दयनीय झालेली आपल्या वेगवेगळ्या आयोगाच्या अहवालातून आपणास दिसून येत आहे खऱ्या अर्थानं हा शेतकरी करणारा शेती करणारा कुणबी समाज असून खरंतर आरक्षणाचा मुख्य उद्देशच हा आहे की एखादा समाज सामाजिक शैक्षणिक आर्थिक आणि नोकरी विषयक जर त्याची टक्केवारी कमी होत असेल तर त्यांचा समाज जीवन उंचावण्यासाठी त्यांना शैक्षणिक सामाजिक आर्थिक नोकर विषयक काही आरक्षण देऊन त्यांचे जीवनमान उंच होण्याचे खऱ्या अर्थानं उद्देश हा आरक्षणाच्या पाठीमागे ठेवलेला आहे परंतु स्वातंत्र्यानंतर आपण पाहत आहोत की मराठा समाजावर वारंवार अन्याय करण्याचा काम या राजकीय नेते मंडळींनी आणि महाराष्ट्र सरकारने केलेला आहे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देणाऱ्या ज्या संस्था महाराष्ट्रामध्ये शासनाने उभारलेले आहेत त्यामध्ये सारथी भारती महाज्योती यासारख्या संस्था महाराष्ट्र शासनाने निर्माण केलेले आहेत या सुद्धा आपल्याला असं दिसून येत आहे की सारथी मध्ये मराठा समाज कुणबी मराठा मराठा समाजातील उपजाती यांचा समावेश केलेला आहे खरंतर ओबीसी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देण्यासाठी किंवा त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी महाजुती नावाची संस्था सरकार नसता पण केलेली आहे मराठा मराठा समाजासाठी जर सार्थी ही संस्था असेल तर मग त्यांचीच उपजाती असलेल्या कुणबी आणि तस्सम जातींना तुम्ही ओबीसी मध्ये महाजुती या संस्थेमध्ये का टाकत नाही हा सरकार समोर आम्हाला पडलेला एक प्रश्न आहे कारण तुम्ही इकडे आरक्षण देण्याच्या वेळेला कुणबी आणि मराठा वेगळे म्हणतात परंतु उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था सारखी मध्ये कुणबी आणि मराठांना एकत्रित टाकतात त्याच ठिकाणी तुम्ही कुणबी यांना महाज्योती मध्ये का टाकत नाहीत हा सुद्धा आम्हाला प्रश्न पडतो जर कुणबी आणि मराठा वेगळेच असतील तर सार्थ या संस्थेतून कुणब्यांना बाहेर काढून त्यांना महाजुती या संस्थेत टाकावे ही आमची सरकार समोर एक मागणी आहे परंतु शासन एकीकडे सांगतो की कुणबी मराठा आणि तस्सम या जाती एकच आहेत मराठा जातीच्या उपजाती आहेत कुणबी शेती करणारा समाज तर मराठा समाज सुद्धा शेती करणारा विदर्भ खानदेश कोकण पश्चिम महाराष्ट्रामध्ये कुणबी आणि तत्सम शेती करणारा समाज हा ओबीसी मध्ये आहे तर बाकी उर्वरित शेती करणारा समाज मराठा जाती अंतर्गत येतो तो मग त्यांना आरक्षणाचा का लाभ शासन देत नाही हा सुद्धा प्रश्न पडतो दुसरा एक मुद्दा असा आहे की कुणबी आणि मराठा या जर वेगळ्या जाती असतील तर विदर्भ खानदेश मराठवाडा पश्चिम महाराष्ट्र कोकण यामध्ये कोणते आणि मराठा यांचे रोटी बेटी व्यवहार लग्न विधीचे व्यवहार एकत्रित पार पडतात सोयरीकता आणि रोटीबीटी यांचे व्यवहार दररोज चालतात मग जर ह्या वेगळ्या जाती असतील तर यांना आंतरजातीय विवाह नोंदणीचे सर्टिफिकेट देऊन त्यांना सानूग्रह आर्थिक मदत शासन का करत नाही हा सुद्धा सामाजिक न्याय विभागाला आमचा एक प्रश्न आहे काय महाराष्ट्रातला सामाजिक न्याय विभाग झोपा काढत आहे एकीकडे तुम्ही म्हणता कुणबी आणि मराठा वेगळे आहे आणि एकीकडे यांचे लग्न व्यवहार होता हे तुम्ही मान्य करत नाही ही दुटप्पीपणाची भूमिका आता सरकारला शासन करताना सोडावी लागेल आणि मराठा समाजाला न्याय द्यावा लागेल कारण मराठा समाजाचा आरक्षणाचा प्रश्न आता ज्वलंत चळवळीचे रूप त्या प्रश्नांना घेतलेला आहे मनोज जरांगे पाटलांसारखा एक सामान्य परिस्थितीतून आलेला असामान्य व्यक्ती या संपूर्ण आंदोलनाचे नेतृत्व करीत आहे मी स्पर्धेने काम केलं निष्कामतीने काम केल्यानंतर लोकशाहीमध्ये आंदोलनाचे सुरू क्रांतीमध्ये परिवर्तित होत असतो हेच याचे उदाहरण आहे आंतरवली सराटी मध्ये शांततेत बसलेल्या महिला आणि समाजावर लाठी चार्ज करून त्यांना संपवण्याचे त्यांच्यावर तडपशाही करण्याचे काम याच महाराष्ट्र सरकारने केलं हे संपूर्ण देशाने पाहिला आहे म्हणजे लोकशाहीला काळी मा फासण्याचे काम आज खुद्द सरकार करीत आहे तरीसुद्धा म्हणून जरांगे पाटील हे नेहमीच सांगत आलेले आहेत ते आपल्याला हा प्रश्न हिसेने सोडवायचा नाही तो आपल्याला शांततेच्या मार्गाने सोडवायचा आहे म्हणून या आंदोलनामध्ये आता मराठा समाजातील सर्व तरुण वर्ग महिला विद्यार्थी आणि सर्व समाजातील वय गटातील सर्व समाज आज सामील झालेला आहे आज ह्या आंदोलनाचे क्रांतीच पुल्लिंग चे पेटला आहे यामागे सर्व तरुण वर्गाची भूमिका तर आहेच परंतु यांचं नेतृत्व करणारे



डॉ.गोविंद मस्के
वडवणी




तरंगे पाटील यांनी स्पर्धेने निष्काम देणे काम करीत असून समाजाला त्यांच्या कामावर प्रचंड विश्वास आहे १९९० पर्यंत १४ टक्के असणारा ओबीसी समाज १९९४ च्या पुढे ३२ टक्के गणला गेला हे काही वर्षांमध्ये कसं शक्य आहे याची सुद्धा नोंद सरकारने घेतली पाहिजे खरंतर ज्याची ओबीसींची संख्या आरक्षणामध्ये ३२% आहे त्या अर्थी हा समाज महाराष्ट्रामध्ये जवळपास ६५% च्या जवळपास आहे हे निश्चित करावे लागते उरलेला ३४ टक्के मराठा २० टक्के मुस्लिम अनुसूचित जाती अनुसूचित जमाती ओपन मधला इतर समाज यांची टक्केवारी जवळपास १६६ कडे जाते आरक्षण तर शंभर टक्के मधून द्यायचे मात्र आज मी तिला ती टक्केवारी १६६ टक्क्याकडे जाते याचीही शासनाने गंभीरतेने यावरती विचार केला पाहिजे इथून मागे ज्या ज्या समाजाला आरक्षण दिले त्या त्यावेळेस कुठल्या आयोगाने यांच्या नोंदी घेतल्या होत्या आणि कुठल्या आयोगाच्या आधारे किंवा कुठल्या निकषांना यांना आरक्षण दिले त्याचेही उत्तर शासनाने दिला पाहिजे मराठा आरक्षणाला वेळोवेळी आरक्षण देत असताना विविध आयोग नेमले त्या आयोगांच्या शिफारसी आल्या आयोगाने सिद्ध करून दाखवलं की मराठा समाज हा मागासलेला आहे शैक्षणिक दृष्ट्या नोकरीत दृष्ट्या आणि सामाजिक दृष्ट्या हा समाज शेती करणारा असून आर्थिक दृष्ट्या संपूर्णतः समाज मागासलेला आहे याच्या वेगवेगळ्या आयोगानं नोंदी देऊन सुद्धा सरकार मुद्दामहून काना डोळा करून यांना समाजावरती अन्याय करीत आलेला आहे मात्र इतर समाजाला काही द्यायचं असेल तर कुठलाही आयोग लागत नाही कुठलाही विश्लेषण लागत नाही कुठलाही अभ्यास लागत नाही रात्रीतून त्यांना आरक्षण दिलं गेली गेली हे या महाराष्ट्राने या देशाने पाहिला आहे मग याचा अर्थ असा घ्यायचा की मराठा समाज या देशाचा नागरिक नाही का मराठा समाजातील तरुण किंवा मराठा समाजातील लोकांनी या देश विरोधी कधी इतिहासामध्ये काम केलंय का याचा या ठिकाणी विशेषत्वाने नोंद घ्यावी लागेल असं जर नसेल तर जाणीवपूर्वक मराठा समाजाच्या बाबतीमध्येच असं का घडतय मागच्या ४० वर्षापासून हे वारंवार वारंवार पुन्हा पुन्हा दिसून येत आहे याचा अर्थ तरी काय घ्यायचा का मराठा समाजाने हा देश सोडून जावं काही देशाला आपला म्हणू नये ही भूमिका शासनाची आहे हे शासनाने आता जाहीर करावं किती मुलांनी या आंदोलनासाठी आरक्षणाचा चळवळीसाठी आत्महत्या केल्या किती तरुण मुलं जीवनापटापासून बाजूला गेले याचा तर शासनाला काहीच घेणं देणं नाही जाणीवपूर्वक हा मराठा समाज निरक्षर कसा राहील हा समाज मागास कसा होईल हा समाज प्रत्येक क्षेत्रातून महाग कसा ढकारला जाईल हीच शासनाची पहिल्यापासून ची भूमिका आहे महाराष्ट्रातील काही पुढारी तर मराठा समाज त्यांचा जातीय दुश्मन असल्यासारखे भूमिका आज घेताना दिसून येत आहेत ते असं काही बोलतात की जणू काही त्यांची आणि मराठा समाजाची पहिल्यापासून ची जातीय दुश्मनी आहे हे महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभणार नाही मराठा समाजाने कुटुंबातील प्रमुख या नात्याने समाजातील एक मोठा भाऊ या नात्याने सर्व समाजाला बरोबर घेऊन पुढे चालण्याचे काम केलेला आहे याला इतिहास साक्षी आहे आणि म्हणून शेती करणारा हा समाज आर्थिक दृष्ट्या शैक्षणिक दृष्ट्या सामाजिक दृष्ट्या जर आज मागे पडत असेल तर त्याला पुढे आणण्याचे काम एक शासन म्हणून सरकारचा आहे शासन वारंवार हे टाळताना दिसून येत आहे आणि म्हणून जर हीच भूमिका शासनाची असेल तर मग यातून मार्ग काढण्याचा पर्याय मराठा समाजासमोर निश्चितच आहे आज आरक्षणाचा आंदोलन अंतिम टप्प्यात आहे ही चळवळ आता जन आक्रोशाची चळवळ झाली आहे यामध्ये मुद्दाम शासन सरकार कुठेतरी फूट पाडण्याचा प्रयत्न करीत आहे जाणीवपूर्वक ग्रामपंचायत च्या निवडणुका याच आंदोलनाच्या वेळी लावून समाजामध्ये या आंदोलनाबद्दल याची तीव्रता कशी कमी करता येईल यासाठीच हा निवडणुकांचा घालमेल त्यांनी मुद्दाहून याच वेळी लावलेला आहे परंतु या सर्व गोष्टीला आता मराठा समाजातील तरुण महिला विद्यार्थी बळी पडणार नाहीत कारण या आंदोलनाचं नेतृत्व करणारा नेता सामान्य परिस्थितीतून आलेला आहे का सामान्य व्यक्ती आहे कर्तुत्व जातृत्व नेतृत्व यांचा सुरेख संगम शिवरायांच्या खऱ्या अर्थाने विचार घेऊन तो आज समाजासाठी लढतोय लोकशाहीमध्ये आपण पाहिला आहे की समाजाचे प्रश्न जर शासन सरकार सोडवत नसेल तर त्या सरकारला पायदळी तुडवण्याची ताकद लोकांमध्ये असते इतिहास आणि पाहिला आहे की अनेक देशांमध्ये अनेक राज्यांमध्ये सरकार उलटून त्या लोकांनी टाकलेले आहेत म्हणून इतिहास मराठा समाजाचा आरक्षणाचा प्रश्न हे सरकार जर मुद्दामहून त्यांच्यावर अन्याय करणार असेल तर या सरकारचं आता दिवस भरले आहेत असं म्हणण्यास काही हरकत नाही या सरकारला मराठा तरुण मराठा महिला आणि मराठा विद्यार्थी घडल्याशिवाय आता स्पष्ट बसणार नाही आणि म्हणून कुठपर्यंत मराठा आता अन्याय आरक्षणाचा अन्याय सहन करील हे आता सांगता येत नाही सहनशील ते सांगता आता होतोय विचाराची लढाई विचाराने लढली पाहिजे असं जरांगे पाटील सांगतात कुठल्याही प्रकारची हिंसा करायची नाही आणि आयुष्याच्या मार्गाने आपल्याला हा आरक्षणाचा लढाई लढून आरक्षणाचा प्रश्न निकाली काढायचा आहे हीच त्यांची भूमिका आहे तरीसुद्धा अतिशय शांततेने आंदोलन करणारा जरांगे पाटील आणि अंतर्वल सराटीमधील महिलावर ग्रामस्थावर अन्याय करणारा हे तुगलकी सरकार रजाकरी सरकार आता काय निर्णय घेता येईल हे आपण पाहूया कारण त्यांना दिलेले ४० दिवस आता पूर्ण होत आलेले आहेत त्यांची चाळिशी भरण्याच्या आधीच जर सरकारने निर्णय नाही घेतला तर याचे गंभीर परिणाम राजकीय जीवनामध्ये अनेक पुढाऱ्यांना भोगावे लागतील याची नोंद या ठिकाणी घ्यावी लागेल या आरक्षणाच्या लढाईमध्ये जय जय पुढारी जय जय पक्ष घाडगाठी आणण्याचा प्रयत्न करतील त्यांना मात्र कायमचा घरी बसवण्याची ताकद या समाजामध्ये आहे काहीजणांची राजकीय दुकान राजकीय जीवन या आंदोलनाच्या माध्यमातून संपलेली दिसतील हे आपल्याला या ठिकाणी मुद्दामहून सांगावसं वाटतं आणि म्हणून अन्याय आता गरीब मराठा सहन करू शकत नाही सरकारचा वारंवार होणारा अन्याय मराठा समाजाच्या सहनशीलतेच्या पलीकडे गेला आहे म्हणून गरीब मराठ्यांना न्याय देण्याचे काम आता म्हणून जरांगे पाटील आणि संपूर्ण समाजाने आता ठरवलेला आहे म्हणून अपेक्षा करूया ती आता येणाऱ्या काही दिवसांमध्ये या गरीब मराठ्यांना न्याय देण्याचे काम सरकार करील आणि तू न्याय त्यांनी जरा नाही दिला तर निश्चितच येणाऱ्या काळामध्ये सरकारने गुंतवून टाकण्याची ताकद या मराठा समाजाच्या तरुणांमध्ये आहे आणि ते दाखवून देतील निश्चितच ठरलेल आहे..

# कंत्राटीकरण व खाजगीकरणा विरोधात हजारो तरुण रस्त्यावर

## शिक्षण नोकरी बचाव समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन








**चंद्रपूर | प्रतिनिधी**

सरकारने काढलेल्या खासगीकरण, कंत्राटीकरणाच्या निर्णयाविरोधात ०६ ऑक्टोंबर रोज शुक्रवारला येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमदार सुधाकर अडबाले यांच्या मार्गदर्शनात धरणे आंदोलन करण्यात आले. दुपारी तीन वाजता सुरू होणाऱ्या या आंदोलनाला साडेबारा वाजेपासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे तरुण, विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. हजारो तरूणांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने देवून सरकारने काढलेला कंत्राटीकरणाचा शासन निर्णय रद्द करावा अशी मागणी केली.

राज्य सरकारने कंत्राटीकरण व शाळांच्या खाजगीकरणाचा घेतलेला निर्णय हा अन्यायकारक असल्याचे सांगत १ नोव्हेंबर २००५ नंतर नोकरीवर लागलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन मिळावी, विद्यार्थी हितासाठी वीस पटाखालील शाळा बंद होऊ नये यासाठी समोर शाळा संकल्पना रद्द करावी, राज्यातील विविध कार्यालयात रिक्त असलेली तथा शिक्षक व प्राध्यापकांची पदे तात्काळ भरण्यात यावी, शासनाने स्पर्धा परीक्षा शुल्काच्या नावाखाली हजारो रुपयांची सुरू केलेली वसुली थांबून स्पर्धा परीक्षेचे शुल्क १०० रुपये करण्यात यावे, तलाठी पदभरती तसेच विविध पदभरती होणाऱ्या पेपर फुटीवर नियंत्रण आणण्यासाठी कायमस्वरूपी कडक असा कायदा करण्यात यावा आदी मागण्या करण्यात आल्या. शासनाने घेतलेल्या निर्णयाविरोधत तरूणांमध्ये प्रचंड असंतोष दिसून आला.यावेळी विविध महाविद्यालयातील चंद्रपूर शहरांमध्ये स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने विद्यार्थिनी, सामाजिक क्षेत्रात काम करणारे विविध संघटनेचे पदाधिकारी, जुनी पेन्शन कर्मचारी संघटना, राज्य मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक संघटना, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ व इतर विविध शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून आंदोलनाला पाठींबा दर्शविला. सरकारने कंत्राटीकरण व खाजगीकरणाचा निर्णय तात्काळ रद्द न केल्यास आक्रोश मोर्चाचा इशारा देण्यात आला. शिक्षण - नोकरी बचाव समिती जिल्हा चंद्रपूरचे यांचे वतीने मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री तथा शालेय शिक्षण मंत्री यांना पाठविण्यात आले.

# जितेंद्र आव्हाड, जयंत पाटील BJP सोबत जाणार होत-प्रफुल्ल पटेल

**मुंबई**-राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि आमदार जितेंद्र आव्हाड हे दोघेही सर्व आमदारांसह जून २०२२ मध्येच भाजपसोबत जाणार होते, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी केला आहे. राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्ह कोणाचे यावर निवडणूक आयोगासमोर सुनावणी होणार आहे. त्याआधीच प्रफुल्ल पटेल यांनी हा दावा केला आहे. जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड दोघेही सर्व आमदारांसह जून २०२२ मध्येच भाजपसोबत जाणार होते, असे पटेल यांनी सांगितले आहे. त्यांच्या या दाव्याने राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघाले आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यावर सुरत गाठून गुवाहाटीला जाण्याचे ठरवले होते. त्याचवेळी ही घटना घडणार होती, असा दावा पटेल यांनी केला आहे. अनिल देशमुख आणि नवाब मलिक त्यावेळी तुरुंगात होते. त्यामुळे त्यांना वगळता



राष्ट्रवादीच्या इतर ५१ आमदारांसह जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाडांनी भाजपसोबत सत्ता स्थापन करण्याची इच्छा व्यक्त करत शरद पवारांना पत्र दिले होते, असही प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले आहे. शिंदेंचे बंड सुरू असताना जयंत पाटील केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार होते. त्यांनी शरद पवारांना तेव्हा कॉल करून याबाबत कळवले होते. मात्र पवारांनी त्यांना रोखले. तसेच पुढचे दोन-तीन दिवस थांबा अन्यथा माध्यमांमध्ये चर्चा होईल, असे पवार यांनी जयंत पाटील यांना त्या वेळी सांगितले होते.राष्ट्रवादी काँग्रेसमधील मंत्री तपास संस्थांच्या त्रासाला कंटाळून भाजपसोबत गेल्याचा आरोप पवारांसोबतचचे नेते करत आहेत. त्यांच्या या आरोपांमध्ये काहीही तथ्य नसल्याचा दावा प्रफुल्ल पटेल यांनी केला आहे.एका माध्यमाच्या कार्यक्रमात शरद पवार यांनी ६-७ आमदार आणि खासदार यांनी माझ्याकडे येऊन भाजप सोबत जाण्याचा प्रस्ताव ठेवल्याचे म्हटले होते. शरद पवारांचा हा दावा प्रफुल्ल पटेल यांनी खोडला आहे. भाजपसोबत जाण्याबाबत अनेकदा चर्चा झाली होती. ६-७ लोकांना त्रास होता म्हणून गेलो, यात काहीही तथ्य नसल्याचे प्रफुल्ल पटेल यांनी म्हटले आहे.

# प्रवाशांना सुखरूप पोहोचवून बस चालकाने सोडले प्राण

**हिंगोली**-सोलापूर येथून प्रवासी घेऊन हिंगोलीकडे निघालेल्या बस चालकाला रस्त्यातच अस्वस्थ वाटू लागले गंगाखेड येथे रुग्णालयात प्राथमिक उपचार घेऊन प्रवाशांना सुखरुप हिंगोली बसस्थानकावर पोहचविल्यानंतर चालकाने कर्मचारी विश्रांती कक्षात प्राण सोडल्याची हृदयद्रावक घटना शुक्रवारी पहाटे उघडकीस आली आहे. सुरेश सदाशिव सलामे (५५) असे चालकाचे नांव असल्याचे पोलिसांनी सांगितले.



या बाबत आगाराच्या सुत्रांनी दिलेल्या माहितिनुसार, चालक सुरेश सलामे हे मागील २५ वपर्षापासून हिंगोली आगारामध्ये चालक यापदावर कार्यरत आहेत. मुळचे यवतमाळ जिल्ह्यातील असलेले सलामे हे मागील काही वर्षापासून हिंगोलीत राहतात.दरम्यान, गुरुवारी दुपारी तीन वाजता लातुर-हिंगोली बस घेऊन ते लातुर येथून निघाले होते. त्यानंतर त्यांना गंगाखेडजवळ अस्वस्थ वाटू लागले होते. त्यामुळे त्यांनी तेथील रुग्णालयात जाऊन प्राथमिक उपचार घेतले अन बस घेऊन पुन्हा हिंगोलीकडे निघाले. रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास प्रवाशांना हिंगोलीच्या बसस्थानकावर सुखरुप सोडून त्यांना पुन्हा अस्वस्थ वाटत असल्याने ते जून्या कर्मचारी विश्रांती कक्षात जाऊन झोपले. लातुर - हिंगोली बस नंतर हिंगोली आगाराची कोणतीही बस रात्री परत येत नसल्यामुळे जुन्या कर्मचारी विश्रांतीकक्षात कोणीही गेले नाही.त्यानंतर आज सकाळी या कक्षात काही कर्मचारी साफसफाई करण्यासाठी गेले असता त्या ठिकाणी चालक सलामे हे मृतावस्थेत आढळून आले. याप्रकाराची माहिती मिळाल्यानंतर आगार प्रमुख थोरबोले, वाहतुक नियंत्रक एफ. एम. शेख, कर्मचारी मुकेश ठोंबरे, पोलिस निरीक्षक विकास पाटील, सहाय्यक पोलिस निरीक्षक महादेव मांजरमकर, जमादार संजय मार्के, अशोक धामणे याच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मयत सलामे यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगोलीच्या शासकिय रुग्णालयात दाखल केला आहे. या घटनेमुळे आगार प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.

# आरोग्य यंत्रणेचे बारा वाजलेले असताना 'एक फुल दोन हाफ' कुठे?:उद्धव ठाकरे

**मुंबई**-राज्यातील आरोग्य यंत्रणेचे तीन तेरा वाजलेले असताना राज्यातील एक फुल दोन हाफ कुठे बसले आहेत? असा खडा सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. यातील एक फुल आणि एक हाफ केंद्रात बैठकीला बसले आहेत. तर दुसरे हाफ कुठे गेले? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. नांदेड, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथे झालेल्या रुग्णांच्या मृत्यूप्रकरणाच चौकशी करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. नांदेड जिल्हा रुग्णालयातील अधिष्ठातावर दबाव टाकण्यासाठी गुन्हा दाखल झाला असल्याचा आरोपही उद्धव ठाकरे यांनी केला.नांदेडमधील अधिष्ठांना मस्तवाल खासदारांनी शौचालय साफ करायला लावले. हे चुकीचेच आहे. मात्र, त्यामुळे त्या खासदारावर गुन्हा दाखल झाला आहे. त्या अधिष्ठांतांवर दबाव टाकण्यासाठीच अधिष्ठातावर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे. केवळ नांदेडच्या अधिष्ठांतांवरच गुन्हा दाखल का करण्यात आला? असा सवाल ठाकरे यांनी उपस्थित केला. छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथील संबंधित जबाबदार व्यक्तीवरही कारवाई करायला हवी, अशी मागणी त्यांनी केली.राज्यातील याच आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात आपण कोरोनाचा सामना केला होता. मात्र, आता त्याच आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून सध्याच्या सरकारला राज्याचे आरोग्य संभाळता येत नसल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे. कोरोना काळातही आम्ही औषधांचा तुटवडा होऊ दिला नसल्याचा दावा उद्धव ठाकरे यांनी केला आहे. विना निविदा औषधी खरेदी म्हणजे भ्रष्ट्राचाराला आमंत्रण



असल्याचा आरोपही उद्धव ठाकरे यांनी केला आहे.सध्या सरकारकडे जाहिराती करायला पैसे आहेत. मात्र, औषधी खरेदी करण्यासाठी पैसे नसल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. सरकारच्या भ्रष्ट्राचारामुळेच रुग्णांचे बळी गेले असल्याचा आरोप त्यांनी केला. राज्यात आजारांची नाही तर भ्रष्ट्राचाराची लाज वाटत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. सर्व सरकारी दलालांची चौकशी करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांनी केली आहे.नागपूरमध्ये पूर आल्यानंतर तेथे जाण्यापेक्षा मुख्यमंत्री आणि त्यांचे कुटुंबिय चित्रपटातील अभिनेते आणि अभिनेत्रींसोबत फोटो काढण्यात व्यस्त होते, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे. तुम्ही हिंदू-मुस्लिम करतात, आता नागपूरमधील नागरिकांच्या घरात गणपती बसलेले नव्हते का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.आरोग्य विभागाच्या माध्यमातून माझ्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात टास्क फोर्स स्थापन करण्यात आली होती. ती टास्क फोर्स आता काय करतेय? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. या टास्क फोर्समध्ये अनेक तज्ज्ञांचा समावेश होता, त्यांचा वापर आता का करण्यात येत नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. कोरोना काळात टास्क फोर्सच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात काम झाल्याचा दावा उद्धव ठाकरे यांनी केला आहे.मुंबई महानगर पालिकेच्या माध्यमातून झालेल्या कामाची चौकशी करण्यात येत आहे. अशीच चौकशी करायची असेल तर काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतच्या मनपाची चौकशी करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांनी केली आहे. यात उत्तर प्रदेश आणि गुजरातमधील मनपाच्या कारभाराचीही चौकशी करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

# अंबुजा सिमेंट कंपनीचे प्रकल्पग्रस्त शेतकरी टॉवरवर चढले

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

नुकतीच अदानी समूहाने घेतलेल्या उपरवाही तालुका कोरपना जिल्हा चंद्रपूर येथील अंबुजा सिमेंट कंपनीचे प्रकल्पग्रस्त शेतकरी कंपनीच्या शेजारी असलेल्या एका उंच टॉवर वर चढले. अंबुजा सिमेंट कंपनी म्हणजेच पूर्वीच्या मराठा सिमेंट कंपनीने शासनासोबत केलेल्या भूसंपादन करारातील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना स्थायी नोकरीमध्ये प्राधान्य देणे गरजेचे असतानाही कंपनीने या प्रकल्पग्रस्त आदिवासी व गैर-आदिवासी शेतकऱ्यांना नोकरीपासून वंचित ठेवले. त्यांच्या ऐवजी विविध राजकीय नेत्यांच्या दबावाखाली स्थानिक रहिवासी असल्याचे खोटे दाखले तयार करून बाहेरच्या लोकांना रोजगार दिला. प्रकल्पग्रस्तांना स्थायी नोकरी मध्ये प्राधान्य देण्याची तरतूद कंपनीने शासनासोबत केलेल्या भूसंपादन करारा मध्ये आहे. मागील पाच वर्षापासून या कंपनीचे प्रकल्पग्रस्त शेतकरी जनविकास सेनेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रपूर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक पप्पू देशमुख यांच्या नेतृत्वात लढा देत आहेत. प्रकल्पग्रस्त उपाशी व बाहेरचे तुपाशी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे . अनेक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झाल्यामुळे ते देशोधडीला लागले. यामध्ये आदिवासी समुदायाच्या लोकांची संख्या लक्षणीय आहे.

**विधान परिषदेच्या उपसभापतींनी निर्देश देऊनही बैठक लावली नाही**

अंबुजा सिमेंट कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांबाबत शेतकरी कामगार पक्षाचे महासचिव विधान परिषदेचे आमदार जयंत पाटील यांनी मार्च २०२३ च्या उन्हाळी अधिवेशनात लक्षवेधी लावली. या लक्षवेधीवर विधान परिषदेच्या उपसभापती नीलमताई गोऱ्हे यांनी महसूल मंत्री राधाकृष्ण पाटील यांना बैठक घेण्याची सूचना दिली. तसेच या बैठकीला आमदार जयंत पाटील यांच्यासोबत विधान परिषदेचे चंद्रपूर येथील आमदार सुधाकर अडबाले यांना पाचारण करण्याची सूचना महसूलमंत्र्यांना दिली.मात्र मागील सात महिन्यांपासून ही बैठक झालेली नाही.

**प्रकल्पग्रस्तांनी दोन महिन्यापूर्वी दिला होता विष प्राशन करण्याचा इशारा**

एकीकडे अंबुजा सिमेंट कंपनीचा भूसंपादन करार रद्द करण्याची कारवाई शासनस्तरावर जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात येत आहे. दबावाखाली शासन अंबुजा कंपनीचा बचाव करीत आहे. तर दुसरीकडे कंपनीच्या विस्तारित प्रकल्पाकरिता जिल्हा प्रशासनाकडून जन सुनावणी घेण्यात येत आहे.या प्रकारामुळे प्रकल्पग्रस्तांच्या भावना संतप्त झाल्या. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी १० ऑगस्ट २०२३ रोजी जिल्हाधिकारी यांना पत्र घेऊन टोकाची भूमिका घेण्याचा इशारा दिला. पत्रकार परिषद घेऊन विष प्राशन करण्याचा सुद्धा इशारा दिला. हा इशारा दिल्यानंतरही जिल्हा प्रशासन किंवा शासनाने मागील दोन महिन्यांपासून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची दखल घेतली नाही.त्यामुळे अखेर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी टॉवरवर चढून आंदोलन करण्याची टोकाची भूमिका घेतली.

प्रकल्पग्रस्तांनी ६० किलोमीटरची पदयात्रा,कंपनीचे गेट रोको ,दिलेली जमीन प्रतीकात्मक स्वरूपात ताब्यात घेणे अशी आक्रमक आंदोलने केल्यानंतर जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची सविस्तर चौकशी केली. प्रत्येक प्रकल्पग्रस्ताच्या अवार्ड क्रमांकानुसार जिल्हा प्रशासनाने कंपनीने किती प्रकल्पग्रस्तांना नोकरी दिली या बाबतचा अहवाल मागितला. मात्र कंपनीने वारंवार ही माहिती देण्यास टाळाटाळ केली. त्याऐवजी आकड्यांच्या स्वरूपात कंपनीने खोटी माहिती देऊन प्रशासनाची अनेकदा दिशाभूल केली. आकड्यांमध्ये कंपनी प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याचा दावा करत असताना भूसंपादनाच्या अवार्ड क्रमांकानुसार सविस्तर माहिती देण्यास कंपनीने टाळाटाळ केल्यामुळे अखेर जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी अंबुजा सिमेंट कंपनीचा भूसंपादन करार रद्द करण्याचा प्रस्ताव दिनांक ५ मार्च २०१९ रोजी शासनाच्या महसूल व वन विभागाकडे पाठविला. त्यानंतर स्मरणपत्र सुद्धा दिले. त्यानंतर चक्क अडीच वर्षानंतर शासनाला जाग आली. शासनाच्या महसूल व वन विभागाने ६ सप्टेंबर २०२१ रोजी अंबुजा सिमेंट कंपनीला कारणे दाखवा नोटीस पाठवून एक महिन्याची मुदत दिली. मात्र त्यानंतरही वर्षभर भूसंपादन करार रद्द करण्याची कारवाई प्रलंबित ठेवली.प्रकल्पग्रस्तांनी वारंवार मुंबईला मंत्रालयात जाऊन पाठपुरावा केल्यानंतर शासनाने पुन्हा एकदा जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना सद्यस्थिती अहवाल मागविला. १४ जुलै २०२२ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत सविस्तर असा सद्यस्थिती अहवाल पाठवून पुन्हा कारवाई प्रस्तावित केली. मात्र जवळपास एक वर्ष लोटूनही शासनाने याबाबत कोणतीही कारवाई केली नाही असा आरोप प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केला आहे .



# पोलीस दलातर्फे स्पर्धा परीक्षा,सायबर सुरक्षा कायदेविषय जनजागृती कार्यक्रम संपन्न

## जिद्द,चिकाटीने परिश्रम केल्यास यशप्राप्ती निश्चित–रवींद्रसिह परदेशी





**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

जिद्द,चिकाटीने परिश्रम केल्यास यशप्राप्ती निश्चितच होते.विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना स्वतःची 'विद्यार्थ्याची' भूमिका प्रामाणिक पार पाडावे.स्पर्धा परीक्षेची तयारी करताना मागे वळून पाहू नये ध्येय,नियोजन,मेहनत,महत्वकांक्षा,त्याग असा यशाचा मूलमंत्र जपा असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी व्यक्त केले.चंद्रपूर जिल्हा पोलीस दल व गोंडपिपरी पोलीस स्टेशनच्या वतीने संयुक्त सायबर सुरक्षा,कायदेविषयक जनजागृती व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम दि.(५) गुरुवारी सकाळी गोंडपिपरीत कन्यका सभागृहात पार पडला यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बोलत होते.गोंडपिपरीचे उपविभागीय अधिकारी बालाजी शेवाळे यांनी बारावीत ४४% मिळाले म्हणून खचून न जाता मेहनतीवर विश्वास ठेवत अभ्यासात सातत्य ठेवत यश मिळवून उपविभागीय अधिकारी पदापर्यंत मजल मारता आल्याचा अनुभव व्यक्त करत प्रशासकीय काम असल्यास थेट कार्यालयात या असे आव्हाहन केले.त्यानंतर मुजावर अली यांनी सायबर सेल बद्दल मार्गदर्शन केले.यावेळी नायब तहसीलदार राजेश मडामे,स्व.ल.कु.कनिष्ठ महाविद्यालयाचे सचिव अजय माडुरवार,चिंतामणी कॉलेजचे प्रा.चव्हाण,प्रा.बामणकर सर,जनता विध्यालयाचे प्रा.नागापुरे यांच्यासह शेकडो विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

**पोंभुरणा तालुक्यातील सोहमचा पोलीस अधीक्षक परदेशी यांच्याशी सवांद साधताना व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर प्रत्येक विध्यार्थी आकर्षक झाले.विद्यार्थ्यांनी कार्यक्रमानंतर परदेशी यांच्या सोबत फोटो काढण्यासाठी विनंती केली असता स्वता जिल्हा पोलीस अधीक्षकांनी विध्यार्थ्यांचे मोबाईल घेऊन त्यांच्यासोबत सेल्फी काढल्याने सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे.**

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून मोहोळ तालुक्यासाठी अडीच कोटीचा निधी मंजुर जिल्हाप्रमुख चवरे यांची माहिती



**मोहोळ –** बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे यांच्या पाठ पुराव्यास यश आले असून त्यांच्या प्रयत्नातून ग्रामविकास व पंचायत राज विभागातून सुमारे दोन कोटी पन्नास लाख रुपयांचा निधी मोहोळ तालुक्यासाठी मंजूर करण्यात आला असल्याची माहीती जिल्हाप्रमुख चवरे यांनी दिली.या संदर्भात माहिती देताना चवरे म्हणाले पेनूर ता मोहोळ येथील ग्रामपंचायत कार्यालया शेजारी छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे सुशोभीकरण करण्यासाठी आठ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाल्यामुळे पेनूर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभे राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.पेनूर गावातील सुमारे एक कोटी रुपयांचा निधी वाड्या- वस्त्यांवर जाणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यासाठी खर्च करण्यात येणार आहे. तसेच तालुक्यातील नांदगाव,ढोकबाबुळगाव, रामहिंगणी,भांबेवाडी, वडवळ, सय्यद वरवडे आदी भागातील रस्ते कॉंक्रिटीकरण, रस्ते खडीकरण, भूमिगत गटार, रस्ता मजबुतीकरण यांसारखी विकास कामे केली जाणार आहेत.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने एक कोटी पन्नास लाख तर जिल्हा परिषदेच्या फंडातून तब्बल एक कोटी असे एकूण अडीच कोटींच्या विकास कामाची मंजुरी शिवसेना नेते चरणराज चवरे यांनी आणली आहे. त्यामुळे स्वातंत्र्य काळापासून रस्ता नसणाऱ्या मोहोळ तालुक्यातील गावकऱ्यांची व शेतकऱ्यांची चांगली सोय होणार आहे.२५१५ ग्राम विकास या योजनेमधून दोन कोटी ५०लाख रुपयांचा निधी मोहोळ तालुक्याला मिळाल्याने सर्वसामान्य जनतेची सोय झाली आहे. तसेच मोहोळ तालुक्यातील शिवसैनिकांना मोठ्या प्रमाणात ताकद देण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खा.श्रीकांत शिंदे हे करीत आहेत.येणाऱ्या काळात मोहोळ तालुक्यात सर्वसामान्य जनतेसाठी पाठपुरावा करून जास्तीत जास्त निधी आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे चवरे यांनी सांगीतले.

## खिदमत सोशल फाऊंडेशनच्या वतीने आज वरोरा येथे भव्य रोगनिदान शिबिराचे आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**

जगाला मानव सेवा हीच श्रेष्ठ सेवा हा संदेश देणारे हजरत मोहम्मद सल्लल्लोहो अलेंही व सल्ला यांच्या जयंतीनिमित्त येथील खिदमत सोशल फाउंडेशन वरोरा व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे यांच्या संयुक्त विद्यमाने ७ ऑक्टोबर रोज शनिवारला एका भव्य रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे .येथील नगर भवनात वरोरा चे माजी नगराध्यक्ष तथा जिल्हा भाजप सचिव अहेतेशाम अली यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या शिबिराचे उद्घाटन वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या हस्ते होत आहे. याप्रसंगी येथील उपविभागीय पोलीस अधिकारी आयुष नोपाणी, वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर प्रफुल्ल खुजे,नगर परिषदेचे मुख्याधिकारी गजानन भोयर, भाजपचे विधानसभा प्रमुख रमेश राजूरकर, शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे व राष्ट्रवादी काँग्रेसचे विलास नेरकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.सकाळी ९ वाजेपासून दुपारी २ वाजेपर्यंत होणाऱ्या या शिबिरात रक्तदाब, ब्लड शुगर, किडनीचे आजार, हृदयरोग, नेत्ररोग, आतड्याचे आजार, पोटाचे आजार, मणक्यातील गॅप, त्वचेचे विविध आजार इत्यादी रोगांचे निदान व त्यावर उपचार केले जाणार आहेत.या रोग निदान शिबिराला येताना रुग्णांनी सोबत आधार कार्ड व रेशन कार्ड आणावे अशी विनंती आयोजकांतर्फे करण्यात आली आहे.या भव्य शिबिराच्या यशस्वीतेसाठी खिदमत सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष सय्यद आसिफ रजा, उपाध्यक्ष सादिक इकबाल थैम, सचिव वसीम इकबाल शेख,कोषाध्यक्ष नियाज अकबर सय्यद यांचे सोबत साजिद पठाण, अन्सार हुसेन शेख ,तनवीर शेख, शोएब शेख हे परिश्रम घेत आहेत.

## नगरसेवक चंदेल यांची गणेश मंडळला भेट

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

वढोली येथे मस्कऱ्या गणपती उत्सव साजरा होत असून अभिलाषा गणेश मंडळाला नगरसेवक ,बाजारसमिती संचालक महेंद्रसिंह चंदेल यांनी नुकतीच भेट दिली.

गुरुवारी दि (५) गणेश मंडळाला भेट देत महाआरती करून गावकऱ्यांसोबत सवांद साधला गणरायाचे आशीर्वाद घेतले.यावेळी बाजार समिती संचालक संदीप पौरकार,अजित कोहपरे,राहुल सोनटक्के,संदीप लाटकर,अक्षय तिवाडे,रंजित आभारे,सुनील पेडपल्लीवर,मारोती चौधरी,शामराव सोनटक्के ,मनोज धानोरकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.नुकत्याच झालेल्या बाजारसमिती निवडणुकीत विजय मिळवल्याप्रसंगी मंडळातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.



## ठाकरे गटाला 'तारीख पे तारीख':महाराष्ट्रातल्या सत्ता संघर्षाची सुनावणी चौथ्यांदा लांबणीवर

**मुंबई–**राज्यातील सत्ता संघर्षानंतर शिवसेनेच्या आमदार अपात्र प्रकरणावरुन सध्या चांगलीच चर्चा रंगली आहे. मात्र, या प्रकरणाची सुनावणी सध्या सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. असे असले तरी उद्धव ठाकरे गटाला या प्रकरणात सध्या फक्त 'तारीख पे तारीख' मिळत आहे. त्यामुळे हे प्रकरण आणखी किती दिवस चालेल हे पाहावे लागेल. आता या प्रकरणाची सुनावणी ३ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे.



शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणासंदर्भातील सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर गेल्याची माहिती आहे.

शिवसेनेच्या १६ आमदार अपात्रतेची सुनावणी आता थेट ३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. यापूर्वी ही सुनावणी ९ ऑक्टोबरला होणार होती. या सुनावणीला सलग चौथ्यांदा पुढची तारीख देण्यात आली आहे. या आधी सर्वोच्च न्यायालयाकडून या प्रकरणावरील सुनावणीसाठी ३ ऑक्टोबर, नंतर ६ ऑक्टोबर आणि त्यानंतर आता ९ ऑक्टोबर आणि आता थेट ३ नोव्हेंबर तारीख देण्यात आली आहे.

# नांदेडमधील जिल्हा रुग्णालयात ७६८ रुग्णांची नव्याने भरती




**नांदेड–**नांदेडमधील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय व रुग्णालयाची राज्यात चांगलीच चर्चा आहे. या रुग्णालयात एकाच दिवसात मृत्यूचा आकडा वाढल्यामुळे राज्य सरकारसह आरोग्य यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. त्यामुळे जिल्हा रुग्णालयाच्या वतीने सध्या रोजची आकडेवारी जाहीर करण्यात येत आहे. त्यानुसार या रुग्णालयात गेल्या २४ तासात एकूण ८१९ रुग्णांनी ओपीडीमध्ये उपचार घेतले.जिल्हा रुग्णालयाच्या वतीने देण्यात आलेल्या आकडेवारीनुसार सद्यस्थितीत ७६८ रुग्ण रुग्णालयामध्ये भरती आहेत. मागील २४ तासात म्हणजेच दि. ४ ते ५ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीपर्यंत एकूण १३६ नवीन रुग्णांची भरती झाली आहे. या २४ तासात १३४ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत, याचबरोबर या २४ तासात ११ अतिगंभीर रुग्णांचा मृत्यू झाला आहे. यात ३ नवजात बालक (पुरुष जातीचे १, स्त्री जातीचे २ ) व बालक १ (स्त्री जातीचे) व प्रौढ ७ (पुरुष जातीचे ६, स्त्री जातीचे १) यांचा समावेश आहे.गत २४ तासात एकूण ४७ शस्त्रक्रिया झाल्या. यात ३४ रुग्णांवर मोठ्या शस्त्रक्रिया तर १३ रुग्णांवर लहान शस्त्रक्रिया करण्यात आल्या. मागील २४ तासात २३ प्रसुती करण्यात आल्या. यात ९ सीझर होत्या तर १४ नॉर्मल प्रसुती झाल्या, अशी माहिती वैद्यकिय अधिक्षक डॉ. गणेश मनुरकर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविली आहे.

## वरोऱ्याची ईश्वरी राऊत महाराष्ट्र व्हॉलीबॉल शालेय संघात

**वरोरा । प्रतिनिधी**

:लोक शिक्षण संस्था, वरोडा अंतर्गत येणाऱ्या लोकमान्य इंग्लिश मीडियम हायस्कूल वरोरा येथील नववीची विद्यार्थिनी कु. ईश्वरी विलास राऊत हिची तामिळनाडू येथे होणाऱ्या १७ वर्षाखालील मुलींच्या शालेय राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेकरिता महाराष्ट्र राज्य संघात निवड झालेली आहे. नुकत्याच बोईसर जिल्हा पालघर येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य शालेय राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये ईश्वरी ने आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून महाराष्ट्र संघात स्थान पटकाविल्यामुळे वरोरा शहरात सर्वत्र तिचे कौतुक करण्यात येत आहे.

ईश्वरीच्या निवडीबद्दल लोक शिक्षण संस्था वरोडाचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील, उपाध्यक्ष श्रीकृष्ण पाटील, कार्यवाह विश्वनाथ जोशी, ड. दुष्यंत देशपांडे. लोकमान्य इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक संजय अंबुलकर, वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशन चे अध्यक्ष गजानन जीवतोडे, विनोद उंमरे, मिलिंद कडवे, राजेश मते, हेमंत घिवे, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांनी अभिनंदन केले . ईश्वरी ने आपल्या यशाचे श्रेय जेष्ठ मार्गदर्शक सुनील बांगडे, निखिल बोबडे, प्रा. उत्तम देऊळकर, राज्य क्रीडा मार्गदर्शक संदीप उईके, त्याचप्रमाणे लोक शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना तसेच वरोरा स्पोर्टस फाउंडेशनच्या जेष्ठ खेळाडूंना दिले.





**सांगा हो साहेब अजून किती वर्ष लागतील रस्ता बनायला ...चिमूर रोड परसोडा पाटी जवळ ट्रक पलटी झाला . असे छोटे मोठे अपघात आता नेहमीचेच झाले आहे . (छायाचित्र –अमित कुरेकार वरोरा)**

## महाराष्ट्र व्हॉलीबॉल शालेय संघात निवड झालेल्या ईश्वरीचा छोटू भाऊंनी केला सत्कार

**वरोरा । प्रतिनिधी**

जिल्हा चंद्रपूर येथील लोक शिक्षण संस्था, वरोडा अंतर्गत येणाऱ्या लोकमान्य इंग्लिश मीडियम हायस्कूल वरोरा येथील नववीची विद्यार्थिनी कु. ईश्वरी विलास राऊत हिची तामिळनाडू येथे होणाऱ्या १७ वर्षाखालील मुलींच्या शालेय राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेकरिता महाराष्ट्र राज्य संघात निवड झाली त्याबाबदल माजी सभापती तथा प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी काँग्रेस कामगार व कर्मचारी विभाग जैरुद्दीन शेख (उर्फ छोटूभाई) यांनी सत्कार केला . नुकत्याच बोईसर जिल्हा पालघर येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य शालेय राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये ईश्वरी ने आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून महाराष्ट्र संघात स्थान पटकाविल्यामुळे वरोरा शहरात सर्वत्र तिचे कौतुक करण्यात येत आहे. यावेळी छोटू भाई यांच्या सह ड.विनोद कत्तरमारे विलास राऊत ,संजय खंळारकर, गोपीचंद कोहळे यांनी ईश्वरीचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .